# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Local Crime Branch, Washim**

**Date of Good Work done** :- **17/05/2022**

**Brief of the work done :-**

सोयाबीन चोरट्यांना 34 लाखांच्या मुद्देमालासह इंदोर मध्यप्रदेश येथून अटक केल्याने कन्हेरगाव येथील श्री.गोपाल बंग यांनी पोलीस अधीक्षक श्री. बच्चन सिंह (भा.पो.से.)यांची भेट घेत पुष्पगुच्छ देऊन पोलीस दलाचे आभार मानले.



## उत्कृष्ट तपास करणाऱ्या पोलिसांचा सत्कार

जऊळका रेल्वे (वा). सोयाबीन चोरीच्या 20 लाख रुपयांच्या गुन्ह्याचा उत्कृष्ट तपास करून गुन्हेगारांना जेरबंद करण्यात यशस्वी ठरलेल्या पोलिसांचा सत्कार करण्यात आला.

येथील मारुती अग्रो फुडस् जऊळका यांचा 250 क्विंटल 65 किलो सोयाबीन घेऊन निघालेला ट्रक मध्येच गहाळ झाला होता. याबाबत गोपाल सुभाषचंद्र बंग यांनी जऊळका रेल्वे पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. सदर घटनेचा तपास ठाणेदार आजिनाथ मोरे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अमोल गोरे यांनी केला. परंतु ट्रक ड्रायव्हर व मालक दोघांचेही मोबाइल स्विच ऑफ करण्यात आल्याने तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे तपास

स्थानिक गुन्हे शाखा वाशीमकडे व
करण्यात आला होता. पोलि
अधीक्षक बच्चन सिंह यांच्
मार्गदर्शनाखाली अपर पोली
अधीक्षक गोरख भामरे, स्थानिक गु
शाखेचे पोलिस निरीक्षक सोमना
जाधव, सहायक पोलिस निरीक्ष
प्रमोद इंगळे, पोलिस हवालदार दीप
सोनवणे, पोलिस नाईक अमो
इंगोले, अश्विन जाधव, सायब
सेलचे पोलिस शिपाई प्रशांत चौधरी
गोपाल चौधरी यांनी आपले कस
पणाला लावत अत्याधुनि
तंत्रज्ञानाचा वापर करून सद
प्रकरणाचा उलगडा करून सद
गुन्ह्यात 35 लाखांच्या मुद्देमालास
गुन्ह्यात सहभागी दोन्ही आरोपीं
जेरबंद करण्यात यश मिळवले.

### मारुती ॲग्रो फुड्सच्यावतीने सन्मान

सदर गुन्ह्याचा छडा लावून आरोपींना मुद्देमालासह जेरबंद करणाऱ्या पोलिस दलाचा जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात जऊळका रेल्वे येथील मारुती अग्रो फुड्सच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी गोपाल सुभाषचंद्र बंग, मारुती अग्रो फुड्सचे मालक श्रीकिसन मंत्री, नंदकिशोर मंत्री, राम मंत्री, संकेत व्यास, लखन मंत्री व सर्व व्यापारी संघ वाशीम यांच्या वतीने पोलिस अधीक्षक बच्चनसिंह, अप्पर पोलिस अधीक्षक गोरख भामरे, स्थानिक गुन्हे शाखा वाशीम चे पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव सहायक पोलिस निरीक्षक प्रमोद इंगळे, पोलिस हवालदार दीपक सोनवणे, पोलिस नाईक अमोल इंगोले, अश्विन जाधव, सायबर सेलचे पोलिस शिपाई प्रशांत चौधरी, गोपाल चौधरी यांचा सत्कार करण्यात आला.